ISBN No : 978-81-931444-1-1





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
(बी.सी.यु.डी.) अंतर्गत व

25 YEARS

महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे

# श्री सिद्धीविनायक महिला महाविद्यालय

कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

मराठी विभाग आयोजित

## राष्ट्रीय चर्चासत्र

शुक्रवार, दि. २२ जानेवारी २०१६ व शनिवार, दि. २३ जानेवारी २०१६

# समाजसुधारकांचे मराठी साहित्याला योगदान

संपादक
प्राचार्या, डॉ. पुष्पा रानडे
कार्यकारी संपादक
प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन

CHAKAN 410501
Tal-Khed, Dist-Pune
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | महात्मा बसवेश्वर यांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे | २१ |
| २) | महात्मा बसवेश्वराचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. डॉ. श्रीपती रायमाने | २९ |
| ३) | महात्मा बसवेश्वरांच्या साहित्यातील नीतिमूल्य विचार | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | ३३ |
| ४) | बिरसा मुंडा यांचे योगदान | प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर | ३९ |
| ५) | बिरसा मुंडाचे सामाजिक योगदान | प्रा. विठ्ठल केदारी | ४३ |
| ६) | आदिवासी साहित्याला बिरसा मुंडाचे योगदान | प्रा. भीमराव वानोळे | ४६ |
| ७) | आदिवासी नायक बिरसा मुंडा | प्रा. संभाजी गायकवाड | ५१ |
| ८) | बिरसा मुंडा – आदिवासी साहित्याचा प्रेरणास्रोत | प्रा. डॉ. कृष्णा भवारी | ५५ |
| ९) | संस्कृतीचा प्रेरणास्रोत : क्रांतिकारक बिरसा मुंडा | डॉ. मंदा नांदुरकर | ५९ |
| १०) | महात्मा फुले यांचे मराठी मराठी साहित्याला योगदान | मोहिनी शेवकरी | ६१ |
| ११) | जोतीराव फुले यांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. प्राची जोशी | ६४ |
| १२) | महात्मा फुले : मराठी साहित्यातील क्रांतियोद्धा | डॉ. नवनाथ दणाने | ७३ |
| १३) | महात्मा जोतिबा फुले यांचे आर्थिक विचार | प्रा. स्वाती कुरमे | ७७ |
| १४) | महात्मा फुले यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये | माणिक शिंदे | ८० |
| १५) | महात्मा जोतीराव फुले यांचे योगदान | प्रा. शिवाजी सिरसाठ | ८३ |
| १६) | महात्मा फुले यांचे सत्यशोधकी साहित्य | सविता आष्टेकर | ८७ |
| १७) | मराठी साहित्यातील दीपस्तंभ : महात्मा फुले | अविनाश ताटे | ९१ |
| १८) | महात्मा जोतीराव फुले यांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. कैलास वानखडे | ९५ |
| १९) | महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान | डॉ. पंढरी डोईफोडे | ९८ |
| २०) | महात्मा जोतीराव फुले : द्रष्टे युगपुरुष | प्रा. शिवाजी एंडाईत | १०१ |
| २१) | समाजसुधारक : महात्मा जोतीराव फुले | प्रा. मीनाक्षी गोणारकर | १०६ |
| २२) | महात्मा जोतीराव फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान | अनिल कलकुटकी | ११० |
| २३) | समाजसुधारक महात्मा फुले यांचे साहित्यातील योगदान | प्रा. डॉ. द. के. गंधारे | ११५ |
| २४) | महात्मा जोतिबा फुले यांचे विचार व कार्य | प्रा. शशिकांत जाधवर | १२० |
| २५) | महात्मा फुले प्रेरीत समकालीन साहित्य | डॉ. नवनाथ गोरे | १२७ |
| २६) | महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान | प्रा. अतुल चौरे, प्रा. चिंतामण धिंदळे | १३२ |
| २७) | महात्मा जोतीराव फुले यांचे विचार व कार्य | डॉ. सुधाकर शेलार | १३७ |
| २८) | म. जोतिबा फुले : वाङ्मय आणि कार्य | प्रा. सरला गोरे –सावकारे | १४१ |




C.S.M.'s Arts & Commerce College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.

# महात्मा जोतीराव फुले : द्रष्टे युगपुरुष

**प्रा. शिवाजी एंडाईत**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
चा.शि.मं.चे कला व वाणिज्य महाविद्यालय, चाकण.
मोबा. ९७६३८९५२२० ई मेल : shivajiendait@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांना गौतम बुद्ध व संत कबीर यांच्या बरोबरीने गुरुस्थान दिले, असे बहुजन, पददलितांचे पहिले नायक, भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले यांच्या साहित्याचे व कार्याचे योगदान बहुमोल आहे. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म सन १८२७ मध्ये एका शेतकरी कुटुंबात झाला. जोतीराव फुले यांचे प्राथमिक शिक्षण पुण्यातील पंतोजींच्या शाळेत व त्यानंतर स्कॉटिश मिशनऱ्यांच्या शाळेत झाले. लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, लोकमान्य टिळक इत्यादी प्रभृती जोतीरांवाच्या समकालीन होत्या. पण, जोतीराव फुले व त्यांची विचारधाराच वेगळी होती. जोतीराव फुले यांची भूमिका क्रांतिकारक, समाजसुधारणावादी, अस्पृश्यता निवारण व स्त्रीशिक्षणाचा हक्क सांगणारी होती.

जोतीरावांनी परंपरागत बंधनांना आव्हान दिले. जातिसंस्थेला, पुरोहित वर्गाने निर्माण केलेल्या बंधनांना पहिला विरोध जोतीराव फुले यांनी केला. जोतीरांवाच्या मताप्रमाणे ब्राह्मणांनी 'हम करे सो कायदा' केला. ब्राह्मणांच्या अधिकाराखाली सर्वसामान्य समाजाला सतत झगडावे लागे. या सर्वाला पहिले आव्हान जोतीरावांनी 'गुलामगिरी' या संज्ञेने दिले. म्हणूनच जोतीराव फुल्यांना 'आधुनिक मानवतावादी संस्कृतीचे आद्य प्रवर्तक' म्हटले जाते. जोतीरावांचे वडील गोविंदरावांनी पेशवाईचा प्रभाव व परिणाम जवळून पाहिला. या कालखंडात शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत केविलवाणी होती. सावकारकीच्या जाचात शेतकरी अडकला होता. शेतकरी निरक्षर, अंधश्रद्ध असल्याने ब्राह्मणांचे वर्चस्व त्यांच्यावर प्रचंड होते. बहुजन समाज सतत अशिक्षित राहावा याकरिता ब्राह्मणांनी विशेष प्रयत्न केले. पण, इंग्रजी राज्यसत्तेने या सर्व हेतूंना हादरा दिला. इंग्रजांनी या कालखंडात अनेक शिक्षण संस्था सुरू केल्या. या शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून आधुनिक समाजसुधारक व धर्मसुधारक निर्माण झाले.

इंग्रजांची राजवट केवळ राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती. या राजवटीचे दूरगामी परिणाम महाराष्ट्रीय समाजजीवनावर झाले. इंग्रजांनी भारतीय समाज जीवनाकरिता अनेक सोयीसुविधा उपलब्ध केल्या. शिक्षण, प्रशासन, न्यायव्यवस्था इ. विविध पातळ्यांवर इंग्रजी अधिकाऱ्यांनी बदल केले. वाङ्मयनिर्मितीला देखील इंग्रजांनी प्रोत्साहन दिले. सन १८४७ साली जोतीरावांनी इंग्रजी शिक्षण पूर्ण केले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीतून जोतीरावांनी प्रेरणा घेतली. स्वातंत्र्य व समता या मानवी मूल्यांविषयी जोतीराव अधिक सजग झाले. एका ब्राह्मण मित्राच्या लग्नात झालेल्या अपमानाने जोतीरावांचे आयुष्यच बदलले. अपमानकारक विखारी शब्द जोतीरावांच्या जिव्हारी लागले. सामाजिक विषमता, उच्चनीचता, ब्राह्मणी वर्चस्व या विचाराने जोतीराव अस्वस्थ झाले. आधुनिक शिक्षणाला पर्याय नाही,



C.S.M.'s Arts & Com. College CHAKAN 410501 Tal-Khed, Dist-Pune.
Principal
C.S.M's Arts & Commerce College
Chakan, Tal-Khed, Dist-Pune.